Maharashtra State Board
Of Secondary & Higher
Secondary Education
Latur Divisional Board
Latur-413531

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, लातूर
विभागीय मंडळ, लातूर-
४१३५३१

सुतामल एरिया,कन्हेरी रोड, राजस्थान शाळेच्या पाठीमागे, गजानन नगर, लातूर

Divisional Chairman Ph :( O) 229258 Divisional Secretary Ph :( O) 258570 Email: - divsecretarylatur@gmail.com

जा.क्र.लाविमं/माध्य.अ/1312
दिनांक :- 16/09/2025

**परीक्षा प्राधान्य/महत्वाचे**

**प्रति,**
मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा
लातूर/नांदेड/धाराशिव.

**विषय :–** माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) फेब्रु–मार्च 2026 परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन स्विकारण्याच्या तारखांबाबत.

**संदर्भ :–** 1.क.रा.मं./परीक्षा–3/3156 दि. 12/09/2025
2.रा.मं./ले–पे 06/परीक्षा शुल्क 2025–26/1454,दिनांक 24/04/2025 रोजीचे पत्र.
3. जा. क.लाविमं/माध्य.अ/248 दि.02/05/2025

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळैामार्फत घेण्यात येणा–या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) फेब्रु–मार्च 2026 परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणा–या नियमित विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे **UDISE+**मधील **PEN-ID** वरून ऑनलाईन पध्दतीने त्यांचे शाळा प्रमुखांमार्फत भरावयाची आहेत.

तसेच पुनर्परिक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate), श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) चे विषय घेऊन प्रविष्ट होऊ इच्छिणा–या विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे त्यांचे शाळा प्रमुखांमार्फत प्रचलित पध्दतीने भरावयाची आहेत. सदरची आवेदनपत्रे **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरावयाची असून त्यांच्या तारखा व तपशील खालीलप्रमाणे आहेत.

| **शुल्क प्रकार** | **माध्यमिक शाळांनी नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे UDISE+मधील PEN-ID वरून ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा तसेच पुनर्परिक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate), श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे, तसेच ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of credit घेणारे विद्यार्थी) विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा** |
|---|---|
| **नियमित शुल्क** | **सोमवार, दिनांक 15/09/2025**<br>ते<br>**सोमवार, दिनांक 06/10/2025** |

| |
|---|
| माध्यमिक शाळांनी संदर्भिय पत्रान्वये कळविल्यानुसार आवश्यक ते परीक्षा शुल्क RTGS द्वारे भरणा करणे व RTGS/NEFT पावती/चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट जमा करावयाची तारीख नंतर कळविण्यात येईल याची सर्व माध्यमिक शाळा प्रगुख/मुख्याध्यापक यांनी नोंद घ्यावी. |

**सर्व माध्यमिक शाळांनी आवेदनपत्रे भरण्यापुर्वी SCHOOL PROFILE मध्ये शाळा, संस्था, मान्यताप्राप्त विषय, शिक्षक याबाबतची योग्य माहिती भरून मंडळाकडे पाठविणे आवश्यक आहे.** सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरून SUBMIT केल्यानंतर आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये माध्यमिक शाळांच्या लॉगिन (SCHOOL LOGIN) मधून PRE-LIST उपलब्ध करून दिलेली असेल, माध्यमिक शाळांनी त्याची प्रिंट काढून आवेदनपत्रात नमूद केलेली सर्व माहिती जनरल रजिस्टरनुसार पडताळून ती अचूक असल्याची खात्री करावी. सदर प्रिलिस्टवर माहितीची खात्री केल्याबाबत संबंधित विद्यार्थ्याची स्वाक्षरी घ्यावी. त्याचप्रमाणे पडताळणी केलेबाबत मुख्याध्यापक यांनी प्रिलिस्टच्या प्रत्येक पानावर शिक्क्यासह स्वाक्षरी करावी.

इ.10 वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळेमार्फत भरावी. सर्व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्त्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे–

1. माध्यमिक शाळांनी नियमित विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे UDISE+मधील PEN-ID वरून भरण्याची सोय उपलब्ध करून दिलेली आहे. UDISE+ मध्ये विद्यार्थ्यांची नोंद नसल्यास संपूर्ण माहिती भरून आवेदनपत्रे सादर करता येईल.
2. पुनर्परिक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate), श्रेणीसुधार व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ट होणारे विद्यार्थी, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of credit घेणारे विद्यार्थी) यांची माहिती UDISE+मध्ये नसल्याने सदर विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीने निश्चित केलेल्या तारखांना ऑनलाईन पध्दतीने भरावयाची आहेत.

**विभागीय सचिव,**
**लातूर विभागीय मंडळ, लातूर**

Digitally signed by
Anupama Ramchandra Bhandari
Date: 15-09-2025 18:10:53

**प्रत माहितीस्तव :–**

1. विभागीय शिक्षण उपसंचालक,
   शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर यांना माहितीस्तव.
2. शिक्षणाधिकारी (माध्य.) जि. प. लातूर/नांदेड/धाराशिव.